27

दैनिक सकाळ ६.८.९

# सुभाष देसाई यांचे व्याख्यान

कोल्हापूर : येथील कमला कॉलेजात प्राध्यापक प्रबोधिनीतर्फे डॉ. सुभाष देसाई यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. व्याख्यात्यांचा परिचय प्रा. सुमती साळुंखे यांनी करून दिला.

आपल्या 'इंडो-फ्रेंच कल्चर' (एक तुलनात्मक अभ्यास) या भाषणात प्रा. देसाई यांनी युरोपच्या आपल्या दौऱ्यातील विविध अनुभवांचे कथन करून युरोपियन लोकांच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. विज्ञानाच्या प्रगतीने जरी युरोपमध्ये उच्चांक गाठला असला, तरी मूलभूत मानवी प्रवृत्ती त्या समाजात प्रकर्षाने जाणवतात. मात्र युरोप हा यंत्राधिष्ठित असल्यामुळे त्यांच्या मनोभूमिका बुद्धिनिष्ठ असतात असे त्यांनी स्पष्ट केले.

व्याख्यानानंतर श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे डॉ. देसाई यांनी दिली. प्रा. सौ टंकसाळे यांनी आभार मानले.